**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५८ । सोमवार १३ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## रस्ताकामात अडथळा ठरणारी धार्मिक स्थळे सात दिवसांत हटवा

### महापालिकेचा अल्टीमेटम । अतिक्रमण विरोधी मोहीम तीव्र होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरात गेल्या वर्ष–दीड वर्षापासून अंतर्गत रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यांवर असणारी व रस्ता रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारी सर्वधर्मीय धार्मिक स्थळे येत्या सात दिवसांत स्वतःहून काढून घ्यावीत, अन्यथा महापालिकेकडून अशी धार्मिक स्थळे हटविण्याची मोहीम राबविण्यात येईल, असा अल्टीमेटम महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात संबंधित सर्वधर्मीय धार्मिक स्थळांची देखभाल करणा–यांना महापालिकेतर्फे नोटिसा पाठविण्यात आल्या असून, त्यात संबंधितांनी त्यांची अतिक्रमणे येत्या सात दिवसांत स्वतःहून काढून घ्यावीत, असा अल्टीमेटम देण्यात आला आहे.

यापूर्वी सिव्हील हॅास्पिटल परिसरातील धार्मिक स्थळे स्वतःहून हटवून घेत नागरिकांनी सहकार्य केले होते. परंतु पुढे सर्जेपुरा भागात अशी धार्मिक स्थळे हटविण्यास विरोध दर्शविल्याने विवाद उत्पन्न झाला होता. या पार्श्वभूमीवर नगर शहरातील ज्या–ज्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण व वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने सार्वजनिक नियोजनात अडथळा ठरतील, अशी सर्वधर्मीय धार्मिक ठिकाणे निष्कासित किंवा स्थलांतरीत करावीत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

#### काय म्हटले आहे नोटिशीत?

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीक, धर्मादाय संस्था, मंदीर ट्रस्ट, धार्मिक संस्था इत्यादींना जाहीर आवाहन करण्यात येते की, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील विषेश करुन रस्त्यामध्ये रस्त्याच्या कडेला, पदपथावर मंदीरे, गुरुव्दारा, चर्च, दर्गा, मजार, कबर इत्यादी वास्तू असल्यामुळे वाहतुकीस, नागरीकास, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, रुग्ण, अग्निशमन, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना अडथळे येतात.अहिल्यानगर शहरातील वाढती लोकसंख्या, वाहने इत्यादींचा विचार करता सदर रस्त्यातील अडथळा ठरणारी धार्मिक स्थळे हटविण्याचे/निष्काषित करण्याची/स्थलांतरीत करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. तरी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत संबंधितांनी अशी अडथळा ठरणारी धार्मिक स्थळे संबंधितांनी स्वतः निष्काषित करावीत/ स्थलांतरीत करावीत, अन्यथा सदरील धार्मिक स्थळे बेकायदेशीर/अतिक्रमित आहेत, असे समजून मुदतीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## वीजप्रश्नावर नगरसेवक निखिल वारे यांनी फकीवरवाड्याचे शाखाअभियंता यांना घेतले फैलावर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नागरिकांच्या वीजप्रश्नावर नगरसेवक निखिल वारे यांनी महावितरणचे फकिरवाडा शाखा अभियंता संतोष मोहिते यांना चांगलेच फैलावर घेतले . त्यामुळे मोहिते यांची चांगलीच बोलती बंद झाली होती.

सध्या पावसाळयामुळे शहरात विजेचे अनेक प्रश्न असुन अनियमित भारनियम, तारांवर झाडांच्या फांद्या पडत असल्याने वायर तुटत असून रात्री अपरात्री वीज जात असल्याने यावेळी महाविरतणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नगारिकांच्या प्रश्नांना उत्तरे न देता मोबाईल बंद करुन ठेवतात तसेच लॅन्डलाईन फोनही जाणीवपुर्वक व्यक्त लागेल अशा उद्देशाने ठेवत असल्याने त्याचा नागरिकांना प्रश्न त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात स्वः निखिल वारे यांनी शाखेचे अभियंता मोहिते यांना फोन लावले परंतु त्यांचा मोबाईल बंद असल्याचे सांगण्यात येत होता.

त्यापार्श्वभुमीवर नगरसेवक निखील वारे यांनी थेट शाखा अभियंता मोहिते यांच्या दालना ठ्िया मांडून त्यांचा चांगलेच धारेवर धरण्यात आले. मी कुठल्याही प्रकारचे कामे घेऊन आलो नसून तुम्ही नवीन आला आहात, तुम्ही सिस्टीम समजुन घ्या, प्रसंगी ४ ते ८ दिवस घ्या, जे प्रश्न तातडीने सोडविणे शक्य आहेत. ते तातडीने सोडवा, ज्यांना वेळ लागेल त्यालाही वेळ लागु द्या., तुमच्याकडे मोबाईल नसेल तर मी मोबाईल देतो असे वारे यांनी ठणकावून सांगितले. मात्र देशी कुलपे लावण्याची भाषा वापरत असाल तर ते चुकीचे असल्याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. ८ दिवस झाले आपल्याला फोन करुन वेळ मागितली. मात्र सदरची वेळ देण्यास मोहिते यांच्याकडून टाळाटाळ होती. त्यामुळे वारे यांनी मोहिते यांना चांगलेच फैलावर घेतले.

तर वीज चोरीप्रकरणी गुन्हे दाखल करा

वीज चोरी होत असेल तर गुन्हे दाखल करावी अशी मागणी करुन फकिरवाडा विभागात ही मोहिम राविताना मोहिते यांनी भरारी पथकासह अन्य विभागाचीही मदत घेऊन कारवाई करणे अपेक्षित आहे.



विहिंपची ३९ वर्षांपासून अखंडीत वारकऱ्यांची आरोग्य तपासणी सेवा

अहिल्यानगर– विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने आषाढी वारीनिमित्त संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीतील वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. मार्केटयार्ड परिसरात झालेल्या या शिबिरामध्ये शेकडो वारकऱ्यांवर उपचार व चरणसेवा करण्यात आली. गेल्या ३९ वर्षांपासून अखंडितपणे विश्व हिंदू परिषदेच्या वतीने हा सेवाभावी उपक्रम.

## श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करा

### काँग्रेसचे तोफखाना पोलिस ठाण्यावर रघुपती राघव राजाराम म्हणत आंदोलन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अयोध्येतील श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, देणगी निधीचा अपहार, पुरावे नष्ट करणे तसेच संबंधित विश्वस्तांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने सोमवारी तोफखाना पोलिस ठाण्यावर वारकरी, टाळकरी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांसह येऊन रघुपती राघव राजाराम म्हणत आंदोलन करण्यात आले. शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी हातात टाळ, आणि फलक घेऊन मूह मे राम बगल मे तिजोरी ‘‘श्रीराम मंदिर वाचवा‘‘, ‘‘चोरी करणाऱ्यांना घरी पाठवा‘‘, ‘‘रामभक्तांच्या देणगीचा हिशोब द्या‘‘, ‘‘श्रीरामाच्या नावावर भ्रष्टाचार चालणार नाही‘‘ अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर तोफखाना पोलीस ठाण्यामध्ये पोलीस निरीक्षक वैद्य यांना निवेदन देऊन संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात नगरसेवक शम्स खान, ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान, माजी नगरसेवक फैय्याज शेख, शामराव वाघस्कर, अभिजीत कांबळे, संजय झोडगे, ॲड साहेबराव चौधरी, राजेंद्र कर्डिले, गणेश भोसले, सुनील क्षेत्रे प्रा. रवी सातपुते आदी सहभागी झाले होते.

निवेदनात म्हटले आहे की, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट हा केंद्र शासनाने स्थापन केलेला वैधानिक ट्रस्ट असून देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने दिलेल्या देणग्यांमधून ट्रस्टकडे मोठ्या प्रमाणात निधी जमा झाला आहे. या सार्वजनिक निधीचा अपहार झाल्याचा संशय असल्याने हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून रामभक्तांच्या श्रद्धेशी आणि सार्वजनिक विश्वासाशी संबंधित गंभीर विषय असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास, सरचिटणीस चंपत राय, विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा, कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी, अधिकारी गोपाल राव तसेच इतर संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (), भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग ॲक्ट () अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ट्रस्टला सुमारे ३२७ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले. दररोज हजारो भाविकांकडून दानपेट्यांमध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या व्यवस्थापनात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीही ट्रस्टच्या जमीन खरेदी व्यवहारांमध्ये कथित अनियमितता झाल्याचे नमूद करून, सुमारे २ कोटी किंमतीची जमीन १८.५ कोटींना खरेदी

■ पान ४ वर

## तोफखाना हद्दीतील सराईत चेनस्नॅचर एलसीबीच्या ताब्यात

### एक लाख बत्तीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत भरधाव मोटारसायकलवरून येत एका महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने पुण्यातील कोथरुड येथून अटक केली आहे. सागर रमेश नागपुरे (वय ३३, रा. सावतानगर, भिंगार) असे अटक करण्यात आलेल्या रेकॉर्डवरील आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि रोकड असा एकूण १ लाख ३२ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक ९ जुलै रोजी सायंकाळी सावेडी येथील पाईपलाईन रोडवर मानसी जीवन महाजन या महिलेचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या अज्ञात चोराने पळवले होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांद्वारे तपास करत आरोपी सागर

■ पान ४ वर



#### रेकॉर्डवरील गुन्हेगार

आरोपी सागर नागपुरे हा पोलिसांच्या अभिलेखावरील गुन्हेगार असून, त्याच्यावर अहिल्यानगर जिल्ह्यातील कोतवाली, तोफखाना, श्रीरामपूर शहर आणि लोणी पोलीस ठाण्यात जबरी चोरी, चोरी, दुखापत आणि आर्म ॲक्ट यासारखे तब्बल १६ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

## पंढरीच्या वारीवर शोककळा

### जेजुरीत टेम्पोच्या भीषण अपघातात तीन वारकरी महिलांचा मृत्यू, अनेक वारकरी जखमी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**जेजुरी –** सध्या वारकरी संप्रदायामध्ये ओढ लागली आहे ती विठुरायाच्या दर्शनाची पण अशातच जेजुरीमधून अत्यंत दुःखद बातमी समोर येते आहे. आज सकाळी जेजुरीमध्ये एका टेम्पोच्या भीषण अपघातामध्ये तीन वारकरी महिलांचा मृत्यू ओढावला आहे. तर अनेक वारकरी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीमध्ये जेजुरी परिसरातील भोंगळे मळा या ठिकाणी हा अपघात झाला. वारकऱ्यांचे सामान वाहून नेणारा टेम्पो अपघातग्रस्त झाला. यामध्ये तीन वारकरी महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर १७ वारकरी जखमी झाले आहेत. दरम्यान जखमी वारकऱ्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी काही जण गंभीर असल्याचे देखील समजते आहे. अपघातामध्ये मृत झालेल्या आणि जखमी झालेल्या वारकऱ्यांची ओळख पटवण्याचे काम पोलीस प्रशासनामार्फत सुरू असून सदर वारकरी हे कोणत्या दिंडीतील होते कोणत्या गावचे रहिवासी होते याचा शोध सुरू करण्यात आलेला आहे. अपघात घडतात स्थानिक नागरिकांनी सुद्धा अपघात स्थळी धाव घेऊन मदत कार्य केले.

या घटनेने वारकरी संप्रदायामध्ये शोककळा पसरली आहे. तर महाराष्ट्र देखील हळहळला आहे. दरवर्षी वारकरी विठुराच्या दर्शनासाठी चालत पंढरपूर पर्यंत जातात प्रत्येकाच्या मनात विठुरायाला सर्वांसाठी काहीतरी सुखाचं मागणं असतं. पण अशातच या अपघातामध्ये या महिलांचा मृत्यू झाल्याच्या बातमीने हळहळ व्यक्त होते आहे.

दरम्यान हा अपघात नेमका कसा झाला याबाबत पूर्ण माहिती मिळू शकली नाही.

### एमआयडीसी पैठण पोलिसांची मोठी कामगिरी

## ६ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघड, ७ जण गजाआड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** एमआयडीसी पैठण पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत मोठी कारवाई केली असून सहा मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणत सात आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीच्या सहा मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत ३ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना ही कारवाई करण्यात आली. फिर्यादी पांडुरंग श्रीकृष्ण वीर (रा. वाहेगाव, ता. पैठण) यांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (एमएच–२० एपी–२०५६) ही मोटारसायकल चोरीला गेल्याची तक्रार दाखल होती.

तपासादरम्यान पोलिसांनी सात संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींकडून मोटारसायकल चोरीच्या साखळीचा उलगडा झाला. त्यांच्याकडून हिरो स्प्लेंडर,




रॉयल एनफिल्ड बुलेट, बजाज प्लॅटिना, बजाज पल्सरसह एकूण सहा दुचाकी जप्त करण्यात आल्या.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये आबासाहेब फुलचंद घुगे, चेतन दत्तात्रय ठगारे, जीवन सोमनाथ गिर्हे, महेश कैलास लहाळे, सागर मारोती जाधव, समीर आयुब शेख आणि शुभम लक्ष्मण गुंड यांचा समावेश आहे.

याबाबत पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले की, मोटारसायकल चोरीचे गुन्हे अत्यंत गांभीर्याने हाताळले जात असून, केवळ चोरीचा वाहनमाल हस्तगत करण्यापुरता तपास मर्यादित न ठेवता संपूर्ण गुन्हेगारी साखळी उघड करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. भविष्यातही अशा कारवाया अधिक प्रभावीपणे सुरू राहतील, असा इशाराही त्यांनी दिला.

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त (दि.१ ऑगस्ट) निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.राजा ठाकूर व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली. ही स्पर्धा दोन गटात होणार आहे. इयत्ता सातवी ते दहावीच्या लहान गटासाठी १.माझा आवडता लेखक किंवा लेखिका,२. ज्ञान हीच खरी शक्ती, ३. मी मुख्याध्यापक झालो/झाले तर... , ४.माझी सहल माझा अनुभव, ५. माझ्या स्वप्नातील माझे शहर असे विषय आहेत. शालेय निबंधासाठीचे शब्द मर्यादा ७०० शब्द आहे. खुल्या गटाच्या निबंध लेखन स्पर्धेसाठी १.स्वराज्याच्या निर्मितीत लोकमान्य टिळकांचे योगदान २.जनरेशन जी ( ) आणि बदलती संस्कृती, ३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र, ४.पर्यावरण पूरक पर्यटन : माझी संकल्पना ,५.वाचन संस्कृती आणि विद्यार्थ्यांचे भविष्य असे विषय आहेत. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होईल. निबंध स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई, खजिनदार तनवीर खान व सहसचिव राहुल तांबोळी , स्पर्धा संयोजक शिल्पा रसाळ व किरण आगरवाल यांनी केले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी ९५९५६६६७७० किंवा ८१४९१०६३३८ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

### वडाळ्यात देशी दारुसाठ्यावर एमआयडीसी पोलिसांचा छापा

पैठण - वडाळा (ता. पैठण) येथे बेकायदेशीररित्या देशी दारूचा साठा करून विक्रीच्या तयारीत असलेल्या एका व्यक्तीवर एमआयडीसी पैठण पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत १,८०० रुपयांचा देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास वडाळा येथील चिंचाच्या झाडाखालील मोकळ्या जागेत छापा टाकण्यात आला. यावेळी जनार्धन दत्तू शेळके (वय ३४, रा. वडाळा, ता. पैठण) हा विनापरवाना देशी दारूचा साठा विक्रीच्या उद्देशाने बाळगत असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान आरोपीकडून प्लास्टिकच्या गोणीत ठेवलेल्या भिंगरी संत्रा या लेबलच्या १८० मिलीच्या १८ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची अंदाजे किंमत १,८०० रुपये आहे.

# श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेंद्र जगताप

## नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** एकमेव मान्यता प्राप्त श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेची अध्यक्षपदासह पदाधिकारी निवडणूक लोकशाही पद्धतीने बिनविरोध पार पडली या नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा पदग्रहण सोहळा सभासद आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड गोकुळ ठुबे यांनी कामकाज पाहिले या निवडणुकीत सर्वानुमते राजेंद्र सोपानराव जगताप यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली तर तीन उपाध्यक्ष, तीन महिला सदस्य,खजिनदार, सह खजिनदार,सरचिटणीस यांसह एकूण ३६ जणांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात,जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती झालेल्या सौ अनिताताई जगताप या उपस्थित होत्या तर हा सोहळा सुरू असतानाच जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी कार्यक्रमाला हजेरी लावत नवनियुक्त कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या व अध्यक्षपदी निवड झालेल्या राजेंद्र जगताप यांचा शाल व पुष्पगुच्छ देत सत्कार केला जगताप यांनी देखील कर्मचाऱ्यांच्या व्यथा ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कानावर घातल्या याप्रसंगी अध्यक्ष राजेंद्र जगताप,निवडणूक निर्णय अधिकारी ॲड गोकुळ ठुबे,अशोक लोंढे यांनी कर्मचाऱ्यांच्या तीव्र भावना व्यक्त करतांना कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचा पाढा वाचत श्री साईबाबा संस्थान प्रशासन कर्मचाऱ्यांना वेठबिगारी असल्यासारखी वागणूक देत असून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी जो पुढे येईल त्याची मुस्कटदाबी प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असल्याचा आरोप करत यापुढील काळात कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला

# ठाणे मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीचा दणदणीत विजय

## रविंद्र चव्हाण-एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपाठोपाठ आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा दिसून आला आहे.

वास्तविक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत सहकार पॅनल विरुद्ध परिवर्तन पॅनल अशी लढत झाली असली, तरीही बहुजन विकास आघाडीचे बँकेवर वर्षानुवर्षे असणारे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपा आणि शिवसेना या दोन्हीही पक्षांचे उमेदवार दोन्ही पॅनलमध्ये उभे केले होते. या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे दोन्ही पॅनलमध्ये मिळून १४ उमेदवार निवडून आल्याने अध्यक्षपदावर कोणाचा उमेदवार निवडून येतो हे पाहणे रंजक ठरले होते.

या रंजक राजकीय अंकानंतर झालेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे १४ तर बहुजन विकास आघाडीचे ७ उमेदवार यांनी मतदान केले. विशेष म्हणजे निवडणुकीतील पॅनलच्या माध्यमातून एकमेकांसमोर उभे ठाकलेले भाजपचे किसन कथोरे आणि कपिल पाटील या दोघांची अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मात्र एकजूट दिसून आली, हा रवींद्र चव्हाण यांच्या राजकीय प्रगल्भतेचा परिणाम असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्याचवेळी शिवसेनेचे एक मत फुटल्याने एकनाथ शिंदे यांना हादरा बसला आहे.

थोडक्यात, या राजकीय नाट्यानंतर आता ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपद भाजपा-शिवसेना महायुतीकडे गेले आहे. अखेर बँकेच्या अध्यक्षपदी अरुण बाळू पाटील यांची तसेच उपाध्यक्ष पदी भाग्यश्री निलेश भोईर यांची निवड झाली आहे. बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व उलथवण्यात रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे या जोडीला यश आलं आहे.

# 'माऊली... पाणी घ्या!' मुस्लिम बांधवांच्या सेवाभावाने भारावली ज्ञानेश्वर पालखी दिंडी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारी ही केवळ पंढरीकडे जाणारी पायी यात्रा नसून, ती महाराष्ट्राच्या संस्कृतीतील समता, सेवा, प्रेम आणि बंधुभावाचा अखंड प्रवाह आहे. या परंपरेला साजेसा हृदयस्पर्शी अनुभव शहरातील कोठला परिसरात पाहायला मिळाला. श्रीक्षेत्र नेवासाहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री ज्ञानेश्वर पालखी सोहळा दिंडीचे शहरातील मुस्लिम समाज आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशन यांच्या वतीने अत्यंत उत्साहात सेवाभावाने स्वागत करण्यात आले. या प्रसंगी धर्मापेक्षा माणुसकी श्रेष्ठ असल्याचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

दिंडीचे कोठला येथे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या गजरात, ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात आणि विठ्ठल नामाच्या घोषात दिंडीचे आगमन झाले. हातात पाण्याच्या बाटल्या आणि अल्पोपहार घेऊन उभे असलेले युवक प्रत्येक वारकऱ्याला प्रेमाने हाक मारत होते ''माऊली... पाणी घ्या... अल्पोपहार घ्या...''. हा सेवाभाव पाहून अनेक वारकरी भारावून गेले. काहींनी या



उपक्रमाचे कौतुक करत, ''हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती'' अशी भावना व्यक्त केली.

दिंडीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांनीही मुस्लिम बांधवांनी केलेल्या आदरातिथ्याला मनापासून प्रतिसाद दिला. अनेकांनी प्रेमाने हस्तांदोलन करुन बंधुभावाचे दर्शन घडविले. काही क्षणांसाठी धर्म, जात, पंथ, भाषा यांचे सर्व भेद विरघळून गेले आणि ''अवघे एकचि झालो आपण'' हा संतविचार प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला.

या स्वागत उपक्रमात सामाजिक कार्यकर्ते साहेबान जहागीरदार, नगरसेवक हाजी शहबाज, मुज्जू शेख, सुशांत म्हस्के, मोहसीन शेख, अकबर अली, दानिश शेख, शाहनवाज शेख, शाकिर शेख, शहबाज बॉक्सर, जाकीर तांबोळी, अकदस शेख, साजिद शेख यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना साहेबान जहागीरदार म्हणाले, ''वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. प्रत्येक वारकरी जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन विठ्ठलभक्ती करतो. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीतून संपूर्ण मानवजातीला प्रेम, समता आणि मानवतेचा संदेश दिला. इस्लाम धर्मदेखील करुणा, प्रेम, सेवा आणि बंधुभाव शिकवतो. त्यामुळे संत आणि सुफी परंपरेचा मूलभूत संदेश एकच आहे माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे.''

ते पुढे म्हणाले, आज काही प्रवृत्ती समाजात जाती-धर्माच्या नावाने भिंती उभ्या करण्याचा प्रयत्न करतात. पण महाराष्ट्राची खरी ओळख ही संत, सुफी आणि समाजसुधारकांच्या समन्वयाच्या विचारात आहे. या भूमीने अनेक सुफी-संतांची शिकवण जपली आहे. प्रेमाचे पूल बांधणे आणि द्वेषाच्या भिंती पाडणे हीच काळाची गरज आहे. या छोट्याशा सेवाभावी उपक्रमातून आम्ही धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय ऐक्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले.

# ढोरकिन शिवारात जुगार अड्ड्यावर एमआयडीसी पोलिसांचा छापा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** ढोरकिन शिवारातील लोहगाव रस्त्यालगत असलेल्या पोल्ट्री फार्मजवळ सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर एमआयडीसी पैठण पोलिसांनी छापा टाकून सहा जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी आणि जुगार साहित्य असा एकूण ९२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जुलै रोजी दुपारी ४.२० वाजता ढोरकिन शिवारातील लोहगाव रोडवरील पोल्ट्री फार्मशेजारी पिंपळाच्या झाडाखाली काही जण झन्ना-मन्ना हा पत्त्यांचा जुगार पैशांवर हार-जीत लावून खेळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. या कारवाईत योगेश्वर गणेशराव मुळे (३५), राजेंद्र रामभाऊ डोंगरे (५२), कारभारी जयराम गवळी (५४), पांडुरंग नामदेव मुळे (६६), नाथा तुकाराम नजर (६३) आणि फिरोज सिकंदर मिर्झा (४८, सर्व रा. ढोरकिन, ता. पैठण) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून १० हजार ९६० रुपये रोख, ३१ हजार रुपयांचे पाच मोबाईल हँडसेट, ५० हजार रुपयांच्या दोन मोटारसायकली तसेच दोन पत्त्यांचे कॅट असा एकूण ९२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दशरथ विश्वनाथ गुरुकुल यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२२/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार कोलते करीत आहेत.

# भिंगारकरांचा संत जनार्दन स्वामी महाराज पालखी दिंडीला भावपूर्ण निरोप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केलेल्या श्री संत जनार्दन स्वामी महाराज (पालखी) पायी दिंडीला भिंगारमध्ये दोन दिवसांच्या मुक्कामानंतर रवाना होताना भिंगारकरांनी अत्यंत भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. दोन दिवस संपूर्ण भिंगार परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता. वारकऱ्यांच्या मुखातून अखंड हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठ्ठलभक्तीचा उत्साह अनुभवत नागरिकांनी दिंडीला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क समोरील मैदानात आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक रिंगण सोहळ्याने भाविकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. 'जय हरी विठ्ठल... श्री हरी विठ्ठल', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' आणि 'श्री ज्ञानदेव तुकाराम' या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ, मृदंग, वीणा आणि हरिनामाच्या गजरात वारकरी भक्तिभावाने तल्लीन झाले होते. महिलांनी पारंपरिक फुगड्यांचा फेर धरत भक्तीचा आनंद व्यक्त केला, तर उपस्थित नागरिकांनीही विठ्ठल नामाचा जयघोष करत रिंगण सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, रोहित चौकसी व त्यांच्या परिवाराच्या हस्ते दिंडीतील पालखीची आरती करण्यात आली. तसेच दिंडीचे प्रमुख ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे यांचा वृक्ष, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, प्रांजली सपकाळ, हेमलता विजयवंशी, संगीता सपकाळ, सर्वेश सपकाळ, श्री विजयवंशी, जहीर सय्यद, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, रवी लालबोंद्रे, भूषण लंगोटे, रवी नामदे, ईवान सपकाळ, सुनील लालबोंद्रे, दीपक गायकवाड, भाऊसाहेब खताडे, भाऊसाहेब गुंजाळ यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी, नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी म्हणाल्या की, आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा अमूल्य सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा आहे. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याचे आहे. भक्तीबरोबरच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश वारीतून दिला जातो. आज केलेले वृक्षारोपण हे भावी पिढ्यांसाठी हिरवाईची भेट असल्याचे त्यांनी सांगितले.

ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे म्हणाले की, वारी म्हणजे चालता-बोलता संस्कार विद्यापीठ आहे. येथे जात, धर्म, पंथ, श्रीमंती-गरीबी असा कोणताही भेद नसतो; सर्वजण विठ्ठलाचे लेकरू म्हणून एकत्र चालतात. हरिनाम, सेवा, त्याग आणि प्रेम हीच वारीची खरी शिकवण आहे. आज पर्यावरण संवर्धनासाठी केलेले वृक्षारोपण हीदेखील विठ्ठल भक्तीच असल्याचे ते म्हणाले.

भक्तीबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव जपत या सोहळ्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क समोरील मैदानात वारकऱ्यांच्या उपस्थितीत ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे व रोहित चौकसी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वारी ही केवळ भक्तीची नव्हे, तर समाजप्रबोधनाचीही परंपरा असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

दोन दिवसांच्या मुक्कामात भिंगारकरांनी वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. भिंगारमधील नागरिकांच्या प्रेम, आदरातिथ्य आणि सेवाभावामुळे वारकरीही भारावून गेले. निरोपाच्या वेळी अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. विठ्ठल नामाच्या गजरात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात दिंडीने पुढील प्रवासाला प्रस्थान केले.

## शब्दकोडे क्रमांक : ४



**आडवे शब्द :** १. भारतीय चलन रुपया ३. भारताचा राष्ट्रीय पक्षी ५. इच्छा, ९. नारळाचे उंच झाड १०. वेळेची गती दर्शवणारा काळ १२. धोका, १४. त्वरेने १५. विभागातील प्रतिष्ठित व्यक्ती १७. व्याधी १८. इंग्रजीत थंड १९. हिंदीत वायदा २०. जल २२. निःस्वार्थ देणगी २३. रान २४. पोटाचा वाढलेला भाग २६. गुरुद्वारातील विनामूल्य भोजन लंगर २७. वास घेण्याचे इंद्रिय २९. करण्यास सोपे ३१. बाग ३३. रीतीनुसार ३५. मैल ३६. पशू ३८. फळाच्या आतील भाग ३९. मिश्रण, ४०. धांदल ४१. रकावग-उलट गवकार ४३. हट्ट ४५. पवन ४६. नेहमी, ४७. नशिबाच्या बळावर खेळली जाणारी खेळी ४८. एखाद्यास दिलेला मान ४९.सदाबहार ५१. माती उपसण्याचे साधन ५२. सप्त ५३. हिंदीत-मी

**उभे शब्द :** १. खिशात ठेवण्याजोगा कपडा रुमाल २. लांबसडक फळभाजी पडवळ ३. किंमत ४. निर्मिती ६. प्रवास ७. नासाडी ८. कात्री १०. हिशेब करणारा ११. क्रमाने येणारी १३. लक्ष ६. गुंड २०. बेचव २१. बट्टा २२. द्वारपाल २३. ज्वारीच्या पिठापासून बनवतात २५. डोळ्यात लावले जाते २८. माहेरच्या विरुद्ध ३०. हल्ला ३२. एखाद्या कामाचा केलेला उदो-उदो ३४. एक बिनवासाचे फूल फूल ३६. एक सुगंधी फूल जाई, ३७. स्वर ३९. वेळ, ४०. धोकादायक ४२. भित्रा ४३. भीमाचे आयुध ४४. एक फूल ४५. शिव ४६. धनादेशावर करावी लागते ४७. गुरांना बांधायची दोरी ४८. औषध ४९. खबर ५०. अकरावा महिना

### शब्दकोडे क्रमांक : ३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | र | सा | ■ | मा | ती | ■ | शे | त | क | री | ■ |
| रा | ग | ■ | र | या | ■ | प्र | को | प | ■ | या | दी |
| ण | ■ | र | म | जा | न | ■ | टी | ■ | ते | ल | ■ |
| सी | ता | ■ | मा | ल | ■ | ला | ■ | ता | रा | ■ | गा |
| ■ | व | र | ण | ■ | ख | ट | प | ट | ■ | चा | य |
| क | ■ | वा | ■ | तु | रा | ■ | ग | ■ | चा | ल | ■ |
| म | घा | ■ | आ | ■ | टा | च | ■ | फ | ळ | बा | ग |
| ळ | ■ | प्र | वे | श | ■ | प | र | वा | ■ | ज | ■ |
| ■ | स | ज | ग | ■ | न | ट | ■ | रा | जा | ■ | छा |
| म | न | न | ■ | आ | ज | ■ | जी | ■ | य | व | न |
| न | ■ | न | वा | ■ | रा | डा | ■ | स | फ | र | ■ |
| वा | डा | ■ | त | रा | णा | ■ | चं | ब | ळ | ■ | सौ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### पान व्यापारी महासंघाचा मोर्चा १४ जुलैला चलो आझाद मैदान, चलो मुंबईचे आवाहन

**अहिल्यानगर- महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर मंगळवारी दि. १४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे. याबाबत महासंघाने नव्याने पत्रक प्रसिद्ध करून राज्यातील सर्व पान शॉप बंद करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांविरोधात हा मोर्चा काढण्यात येत आहे. राज्यभरातील पान शॉप व्यावसायिकांनी १४ जुलै रोजी आपला व्यवसाय बंद ठेवून मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबवाव्यात तसेच सुगंधी तंबाखूवरील बंदीबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.पानपट्टी चालकांवर होणाऱ्या बेकायदेशीर कारवाया थांबवाव्यात. पोलिसांकडून होणारा चुकीच्या मोक्का कायद्याचा वापर रोखावा. पान शॉप व्यावसायिकांना अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून द्यावे. प्रत्येक पान दुकानदाराच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय अथवा निमशासकीय सेवेत संधी द्यावी. पान व्यवसायाच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करावी. या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी, कार्याध्यक्ष शरद मोरे, तांत्रिक सल्लागार हेमंग शहा, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, महेश मुर्तडकर, लातूर जिल्हाध्यक्ष मसूद काझी, सांगली जिल्हाध्यक्ष रत्नाकर नांगरे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी करीत असून, पान शॉप व्यावसायिकांनी सोमवारी रात्री ११ वाजता माळीवाडा बस स्थानक जवळून आंदोलनाला जाण्याची सुरुवात होणार असून मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

### रायचंद बागमार यांचे संथारा व्रतात निधन

**अहिल्यानगर - अरणगाव (ता. नगर) येथील**



**व्यावसायिक रायचंद कचरदास बागमार (वय ८५) यांचे संथारा व्रतात निधन झाले. त्यांची मुलगी दीपाली मंडलेचा यांनी त्यांना सागरी संथारा दिला होता. त्यात त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्यामागे दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगर शहरातील वैदूवाडी (सावेडी) परिसरातील हसमुख सुपर मार्केटचे संचालक संतोष बागमार व अरणगाव येथील संगीता प्रोव्हीजनचे संचालक सचिन बागमार यांचे ते वडील होत.**

## पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी भगवान राऊत तर सचिवपदी संदीप शिंदे यांची निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेची समन्वय बैठक व वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ११ जुलै रोजी न्यू इंग्लिश स्कूल पारनेर विद्यालयात उत्साहात पार पडली. माध्यमिक शिक्षक संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष श्री बाळासाहेब निवडूंगे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव श्री अमोल ठाणगे,क्रीडा संघटनेचे अध्यक्ष श्री बापूसाहेब होळकर माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक श्री विजय पठारे,पारनेर तालुका टीडीएफचे अध्यक्ष श्री सुदाम दळवी,विज्ञान शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री सोपान गवते,कलाशिक्षक संघटनेचे सचिव श्री मंगेश काळे, पर्यवेक्षक श्री जयवंत पुजारी तसेच तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांच्या उपस्थितीत पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव श्री अमोल ठाणगे यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली. त्यानुसार अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे ढवळपुरी शाखेतील शिक्षक श्री भगवान राऊत यांची अध्यक्षपदी तर रयत शिक्षण संस्थेच्या वडझिरे शाखेतील श्री संदीप शिंदे यांची सचिव पदी निवड करण्यात आली.

यावेळी शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष श्री बाळासाहेब निवडुंगे यांनी संघटनेने आजवर सातत्याने संघर्षाची भूमिका घेत शिक्षकांच्या व माध्यमिक शिक्षणाच्या प्रश्नांसाठी अविरत काम केले आहे असे प्रतिपादन केले. जिल्ह्याचे सचिव श्री अमोल ठाणगे यांनी समन्वयाची भूमिका मांडत शिक्षक हितासाठी लढा दिल्यासच संघटना टिकाव धरेल असे मत व्यक्त केले.

दरम्यान सहसचिव पदावर श्री अरुण काळे, उपाध्यक्षपदी श्री रमेश गायकवाड व श्री संपत गुंड तर खजिनदारपदी श्री राहुल झावरे सर यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून संजय कारखिले, शिवाजी येणारे, बाबासाहेब जाधव, राजेंद्र आहेर, रवींद्र पायमोडे, रमेश दरेकर, निलेश पाचारणे,अभिजीत जाधव, सतीश सोनवणे, राजेंद्र खोसे यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी माध्यमिक शिक्षक सोसायटीचचे संचालक श्री विजय पठारे,श्री बापूसाहेब होळकर,श्री सुदाम दळवी,श्री जयवंत पुजारी,श्री बाबासाहेब दौंड,श्री मंगेश काळे यांनी नवीन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या आणि आपले मनोगत व्यक्त केले. सदर सभेसाठी श्री संतोष पारधी,श्री विलास पावडे,श्री प्रवीण आवारी,श्री सुनील औटी,श्री धनंजय खोसे तसेच तालुक्यातील अनेक माध्यमिक शिक्षक मोठ्या संख्येने हजर होते.अहमदनगर माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन श्री आप्पासाहेब शिंदे व जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री सचिन झगडे यांनी नूतन कार्यकारणीचे अभिनंदन केले.

नूतन अध्यक्ष श्री भगवान राऊत व सचिव श्री संदीप शिंदे यांनी आगामी काळात शिक्षक संघटनेतील ज्येष्ठ मार्गदर्शक व नवीन कार्यकारणी यांच्या समन्वयातून संघटनेची वैचारिक बांधणी अधिक मजबूत करून शिक्षण व्यवस्थेतील सर्व घटकांच्या समस्या सोडवण्यावर भर देऊ व संघटनेच्या माध्यमातून शिक्षक हितासाठी प्रभावीपणे काम करू असे आश्वासन दिले.

## जिल्हा आयुष रुग्णालयात ग्रीन आर्मी कोअर कमिटीचे वृक्षारोपण

**। औषधी गुणधर्म असलेल्या देशी वृक्षांची लागवड**
**। पर्यावरण संवर्धनाचा दिला प्रभावी संदेश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि भावी पिढीसाठी हरित वारसा निर्माण करण्याच्या उद्देशाने येथील जिल्हा आयुष रुग्णालय परिसरात ग्रीन आर्मी कोअर कमिटीच्या वतीने वृक्षारोपण अभियान उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. या अभियानात बकुळ, आपटा, चिंच, लिंब यांसारख्या औषधी गुणधर्म असलेल्या देशी वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाबरोबरच आरोग्यदायी परिसर निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

या वृक्षारोपण कार्यक्रमास राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन समिती मोहिमेचे प्रा. हर्षल आगळे, जिल्हा सल्लागार व सनियंत्रण समितीचे अशासकीय सदस्य नगरसेवक दत्ता गाडळकर, सविताताई मोरे, वृक्षमित्र अजित कटारिया, प्रा. राजेंद्र देशमुख, ग्रीन आर्मी कोअर कमिटीचे इंजि. प्रताप काळे, संजय जोशी, बंडू पवार तसेच जिल्हा आयुष रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुवर्णमाला बांगर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच उपचारासाठी आलेल्या रुग्णांशी संवाद साधत वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक महत्त्व विशद केले. केवळ वृक्ष लागवड करून न थांबता त्यांचे नियमित संगोपन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि घटत चाललेली हरित संपदा लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## नुसत्या आदर्शाच्या गप्पा...



आग्र्याला मुघल सम्राट औरंगजेबच्या दरबारात औरंगजेबाच्या सन्मानाप्रित्यर्थ एका समारंभास हिंदुस्थानातील विविध प्रांतातील राजे,सरदारांना निमंत्रण दिले होते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजा छत्रपती शिवाजी महाराजांना या समारंभाचे खास निमंत्रण होते. महाराज औरंगजेबाच्या दरबारात समारंभासाठी पोहोचले. त्याकाळी महाराजांच्या शौर्याची, पराक्रमाची किर्ती सर्वदूर होतीच. समारंभात महाराजांच्या प्रतिष्ठेला शोभेल अशी बसण्याची व्यवस्था केली गेली नव्हती.हा प्रकार अपमानास्पद होता. महाराजांच्या सन्मानाला निश्चितच ठेच पहुंचेल असे हे वर्तन होते. यामुळे स्वाभिमानी महाराज तडक या दरबारातून निघाले. हे येथे सांगण्याचा उद्देश असा की, महाराष्ट्राचा हा स्वाभिमान होता.

या स्वाभिमानाचा संस्कार महाराजांनी महाराष्ट्राला दिला. आताच्या काळात महाराजांचे नाव अभिमानाने घेणाऱ्या नेत्यांमध्ये असा स्वाभिमान राहिला आहे का ?

छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांशी, आपल्या दुष्मानांशी दोन हात करीत त्यांना धूळ चाखून आपल्या राज्याची निर्मिती केली. खरेतर हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी, रयतेच्या कल्याणासाठी महाराजांनी आपले सारे आयुष्य वेचले..

छत्रपतींनी आपल्याला केवळ राज्यच नाही दिले तर त्याबरोबर स्वाभिमान दिला, त्याग करण्याचची शिकवण दिली. आज या महाराष्ट्रात कोणत्याही विधायक, कल्याणकारी कामाची सुरुवात करतांना आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करतो.

छत्रपती संभाजी महाराज, महात्मा गांधी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज,अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी, गाडगे महाराज अशी कितीतरी युगपुरुष, कर्तबगार महिला या राज्यात होऊन गेल्या.

आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने,स्वराज्याच्या स्वप्नाने त्यांनी आपल्याला त्यांच्या जगण्यातून खऱ्या अर्थानं प्रेरणा दिली. आणि आज या साऱ्या महात्म्यांचे आपण नेमके कशासाठी स्मरण करतो...?

त्यांचा आदर्श डोळ्यासमोर रहावा म्हणून..? त्यांच्या कार्याचा आदर वाटतो म्हणून..? त्यांनी जगलेल्या स्वाभिमानाची ऊर्जा मिळत राहावी म्हणून...? आपल्यालाही याचं प्रकारे कार्य करायला हवे यासाठी? की छत्रपतींच नाव घेऊन जनतेला वेड्यात काढायचं.. छत्रपतींच नाव घेऊन जनतेला गोळा करायचं... छत्रपतींच नाव घेऊन निवडणूक जिंकायची छत्रपतींच नाव घेऊन बहुजनांना जिंदाबाद, मुर्दाबाद करायला लावायचं... की छत्रपतींच नाव घेऊन सारा महाराष्ट्र लुटायचा...? हो हेच खरं आहे.. सगळी लुटालूट चालू आहे... साऱ्याच क्षेत्रात... लोकशाहीची जगातील राजधानी असलेल्या आपल्या देशात साध्या महापालिकेच्या निवडणुकीतही बूथ कॅप्चर, निवडणुकीच्या साऱ्या यंत्रणा पैसा देऊन त्याबाबत घेतल्या जातात. कला,क्रीडा, साहित्य क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. आज ज्याला त्याला आपली स्वतःची पडली आहे. ज्या राजकारणाला संवेदना आहेत, आपल्या मातीविषयी, देशाविषयी,शहराविषयी प्रेम आहे, आपल्या शहरासाठी, गावासाठी आपण योगदान दिले पाहिजे ही कर्तव्याची जाणीव आहे तीच व्यक्ती आपले कार्य उत्तम करू शकते व आपल्या शहराला, गावाला उत्तम स्थितीत आणू शकते.

पण तसे होणार नाही. आता छत्रपतींच नाव घेत जो तो पैसा कमावण्याच्या मागे आहे.

छत्रपतींचा आदर्श घेत हे लबाड नेते दोन दिवस ही नीटपणे जगू शकत नाहीत. आपण पुतळे उभारतो जयंती साजरी करतो ढोल वाजवतो पण खरंच स्मरण करा, मनाशी बोला, छत्रपतींच्या, वरील महान व्यक्तिमत्वाच्या कार्याला मनापासून किती वंदन करता...?

यांचे आदर्श घेत खरंच या शहरासाठी आपले योगदान देता का ?

तर नाहीच, या लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेत,त्यांच्या नावाच्या घोषणा देऊन

प्रचंड पैसा कमवायचा आहे.निवडणूक जिंकायची आहे महाराष्ट्र ताब्यात ठेवायचा आहे

आणि हा महाराष्ट्र कंगाल, उध्वस्त करायचा आहे. कोणाला स्वतःचा , राज्याचा स्वाभिमान राहिला आहे..?.... खोके मिळाले की पाहिजे तिथे पाय पकडायला तयार असलेल्या नेत्यांनी कशाला स्वाभिमानाची भाषा करावी..? अन् कशाला महाराजांचे नाव घ्यावे?

**जयंत येलुलकर,**
**मा. नगरसेवक**
**अहिल्यानगर**
**९८२२०९६९६१**

## पुण्यानुमोदन म्हणजे गेलेल्या व्यक्तीने ह्यात असताना केलेल्या चांगल्या कार्याचे स्मरण ठेवणे – भास्कर साळवे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**माणूस हा जीवन जगताना तो किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला याला महत्त्व असते.बौद्ध धर्मात मृत व्यक्तीच्या स्मरणात त्याच्या आत्म्याला सद्गतीसाठी केला जाणारा पुण्यानुमोदन आणि जलदान विधी महत्त्वाचा असतो. पुण्य + अनुमोदन म्हणजे मृत व्यक्तीने हयात असताना केलेल्या चांगल्या कार्याचे स्मरण ठेवून त्या कार्याला अनुमोदन देणे या साठी हा विधी असतो.असे प्रज्ञारत्न कमलवीर भास्कर साळवे यांनी प्रवचन करताना मार्गदर्शन केले. निर्मल नगर येथील बौद्ध संस्कार संघाचे महाउपासिका स्मृतीशेष सौ.उषा मिराजी साळवे यांच्या पुण्यनुमोदन जलविधी कार्यक्रमात साळवे बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी एम.बी.साळवे, रामदास साळवे,साहेबराव साळवे आदी उपस्थित होते.

श्री.भास्कर साळवे पुढे म्हणाले जीवनाची अनित्यता, दानाचे महत्त्व यामुळे लोकांना पुण्य कसे अनुमोदन करावे हे समजते. या विधी मुळे दुःखाचे निवारण करणे हा हेतू असतो गेलेल्या व्यक्तीबद्दल शोक करू नका, त्यामुळे दुःख वाढते. आचार, विचार शुद्ध ठेवा. शोक व्यर्थ आहे.

## वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलभक्ती - आमदार संग्राम जगताप

**वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेसाठी पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष व केमिस्ट असोसिएशनचा पुढाकार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे पायी निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध सामाजिक संस्था पुढे सरसावत असताना, पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष व अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने आदर्शवत उपक्रम राबविला. शहरात मुक्कामी आलेल्या संत निवृत्तीनाथ महाराज पालखी दिंडीतील वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला.

या आरोग्यसेवा उपक्रमाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक दत्ता गाडळकर, उपाध्यक्ष भरत सुपेकर, खजिनदार मनोज खेडकर, अमित महाराज धाडगे, सागर फुलसौंदर, अवधूत बोरुडे, संजय गुगळे, डॉ. विनय शहा, संभाजी काकडे, प्रेमकुमार तावरे, शिरीष बारस्कर, विनीत पोकळे, अजित तांबे, ज्ञानदेव यादव, श्रीराज सुपेकर, युवराज गुंजाळ, विकी दुल्लम, महेश म्हस्के यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वारकऱ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून डोकेदुखी, ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, पायदुखी, स्नायूंचा त्रास, थकवा तसेच इतर किरकोळ आजारांवरील आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. सलग पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे वारकऱ्यांसाठी फिजिओथेरपी व मसाजची देखील सोय करण्यात आली होती.

सकाळच्या सत्रात कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी उपक्रमाला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत त्यांना औषधांचे वाटप केले आणि अशा सेवाभावी उपक्रमांमुळे वारीची परंपरा अधिक समृद्ध होत असल्याचे सांगितले. दरवर्षीप्रमाणे यंदाही केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने वारकऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारली. विशेषतः ज्येष्ठ वारकरी, महिला आणि लहान मुलांना आवश्यक औषधे व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देण्यात आलेल्या आरोग्य सेवा देण्यात आली. त्यामुळे हजारो वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, श्रद्धेची आणि समतेची महान परंपरा आहे. हजारो वारकरी अनेक किलोमीटरचा पायी प्रवास करत विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. या प्रवासात त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रत्येक समाजघटकाची जबाबदारी आहे. अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने अनेक वर्षांपासून सातत्याने राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. तर पालकमंत्री आरोग्य सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून यामध्ये आनखी भर पडली आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात विठ्ठलाची सेवा असून, अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक दत्ता गाडळकर म्हणाले की, ''आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला दरवर्षी लाभते. अनेक वारकरी सलग पायी प्रवास करत असल्याने त्यांना किरकोळ आरोग्य समस्या उद्भवतात. अशा वेळी त्वरित औषधे आणि प्राथमिक उपचार उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम अखंडपणे सुरू असून, प्रत्येक वर्षी हजारो वारकरी त्याचा लाभ घेत आहेत. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवा देणे हीच आमच्या असोसिएशनची परंपरा आहे. भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात अशा सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## श्री माहेश्वरी पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी बजरंग दरक यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री माहेश्वरी पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी बजरंग दरक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ट्रस्टची वार्षिक सभा संस्थेचे अध्यक्ष ॲड. महेश काबरा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या सभेत दरक यांची सण २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी एकमताने अध्यक्षपदी निवड झाली. यावेळी संस्थेचे ट्रस्टी, इतर पदाधिकारी तसेच कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली.

बजरंग दरक हे गेल्या १३ वर्षापासून संस्थेचे खजिनदार म्हणून काम पाहत होते. त्यांच्या चोख व प्रामाणिक योगदानामुळे संस्था भरभराटीस येण्यास मदत झाली. सभेमध्ये संस्थेचे ट्रस्टी म्हणून श्यामसुंदर सारडा, मदनलाल मालपाणी, मोहनलाल मानधना, श्यामसुंदर जाखोटिया, ओमप्रकाश चांडक यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी विनोद मालपाणी, सचिवपदी रविकांत काबरा, सहसचिव श्रीनिवास सारडा, खजिनदार नंदकिशोर झंवर यांची निवड झाली.

संस्थेच्या कार्यकारी मंडळात अतुल डागा, मुकुंद धूत, धीरज लड्डा, राजेंद्र सारडा, विजय जाखोटिया, भरत जाखोटिया, बालकिसन जाखोटिया, राहुल सारडा, रामेश्वर बियाणी, केदार लाहोटी, राहुल सारडा, सुरज सोमानी यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे यांचे समाजातील सर्वांकडून अभिनंदन होत आहे.

## ९ ऑगस्टला अहिल्यानगरात समस्त आंबेडकरी समाजाचा विराट मोर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील सिद्धार्थ बुद्ध विहार, सिद्धी बाग येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाला तीव्र विरोध नोंदविण्यात आला. तसेच संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचविणाऱ्या निर्णयांविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चे नंतर ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त अहिल्यानगर शहरात विराट संविधान बचाव मोर्चा काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या मोर्चामध्ये जिल्हाभरातील समस्त आंबेडकरी समाज, विविध सामाजिक संघटना, शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, माळीवाडा, पांचवीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, टेली खुंट, नेतासुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट मार्गे नीलक्रांती चौक येथे समारोप होणार आहे.

बैठकीत उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्टात समाविष्ट असलेल्या अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा अधिकार हा संसदेचा विषय आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना त्या संदर्भातील अधिकार देणारा निर्णय दिल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या निर्णयामुळे समाजात जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असून, विविध जातींमध्ये संघर्षाचे वातावरण तयार होऊ शकते, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

तसेच भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्टात समाविष्ट असलेल्या ५९ अनुसूचित जातींच्या यादीत कोणताही बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच असल्याचे मत बैठकीत मांडण्यात आले.

# आषाढी पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आरोग्य सेवेचा दिलासा!

## मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत दोन ठिकाणी चरणसेवा उपक्रमांचे आयोजन



दोन दिंडीची अनोखी भेट श्री संत निवृत्तीनाथ पालखी सोहळा मार्केट यार्ड येथील हमाल पंचायत येथे असून त्या ठिकाणी संजीवनी समाधी सोहळा पार पडला. अहिल्यानगर शहरातील भाविकांनी संत निवृत्ती नाथ महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी मोठी गर्दी केली होती. अशातच नेवासा येथील ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पालखीचे हमाल पंचायत या ठिकाणी आगमन झाले असता दोन्ही पालखीची भेट झाली तो अतिशय अविसमरणीय योग होता. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी दर्शन घेऊन स्वागत केले. यावेळी हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले तसेच दोन्ही देवस्थानचे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. ( छाया - राजू खरपुडे ,नगर)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत चरणसेवा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पी. व्ही. बेल्हेकर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, नेवासा तसेच डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज यांच्या माध्यमातून दोन ठिकाणी चरणसेवा व आरोग्य सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

श्री रोकडोबा हनुमान दिंडी, बेलपिंपळगाव येथील आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी उस्थळ दुमला येथे पी. व्ही. बेल्हेकर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, नेवासा यांच्या वतीने चरणसेवा उपक्रम राबविण्यात आला. तसेच आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त विविध पायी दिंड्यांमधील वारकऱ्यांसाठी अहिल्यानगर येथील मार्केट यार्ड परिसरात डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज यांच्या माध्यमातून चरणसेवा उपक्रमाचे



आयोजन करण्यात आले.

दोन्ही ठिकाणी वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने चरणसेवा करण्यात आली. पायांना औषधी तेलाने मसाज केल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण व थकवा कमी होण्यास मदत झाली. त्यामुळे पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवचैतन्य लाभले. यावेळी वारकऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमांमध्ये संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांतील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वारकऱ्यांना आपुलकीने, तत्परतेने आणि सेवाभावाने चरणसेवा उपलब्ध करून देण्यात आली.या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अहिल्यानगर मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे डॉ. रेहान शाह आणि स्वप्नील कच्छवे यांनी संबंधित संस्थांशी समन्वय साधून नियोजन व आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चरणसेवा या सेवाभावी उपक्रमामुळे पायी प्रवासातील थकवा कमी होऊन पुढील वाटचालीस मोठा आधार मिळाल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष तसेच पी. व्ही. बेल्हेकर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, नेवासा आणि डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज येथील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, विद्यार्थी, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# एमएसबीटीई उन्हाळी २०२६ डिप्लोमा परीक्षेत डॉ.पाऊलबुधे फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी एमएसबीटीई उन्हाळी २०२६ डिप्लोमा परीक्षेत प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.

प्रथम वर्ष डिप्लोमा परीक्षेत गायकवाड अंकिता डेव्हिड हिने ७६.३०% गुणांसह प्रथम क्रमांक, पठारे यश मायकल याने ७५.१०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर वारंगुळे अनुष्का सत्यनारायण हिने ७३.९०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. द्वितीय वर्ष डिप्लोमा परीक्षेत सय्यद मेहविश अदनान हिने ७८.९१% गुणांसह प्रथम क्रमांक, दरंदले श्रावणी संजय हिने ७७.९१% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर शेख बुशरा हमीद हिने ७७.४६% गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला.

डिप्लोमा इन फार्मसीचे प्राध्यापक व परीक्षा विभागप्रमुख श्री.आबिदखान पठाण यांनी प्रथम व द्वितीय वर्षाच्या एमएसबीटीई उन्हाळी २०२६ परीक्षेच्या निकालाची टक्केवारी व गुणवंत विद्यार्थ्यांची माहिती दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष श्री.रामभाऊ बुचकुल, सचिव श्री.रामकिसन देशमुख, खजिनदार श्री.दादासाहेब भोईटे, व्यवस्थापकीय संचालक श्री.साई पाऊलबुधे तथा सदस्य श्री.रघुनाथ कारमपुरी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच बी.फार्म.चे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी. फार्म.च्या प्राचार्या डॉ.अनुराधा चव्हाण, विभागप्रमुख डॉ.वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर, प्रा.स्वाती कडनोर तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम, पालकांचे सहकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि परीक्षा विभागाच्या नियोजनामुळे हे यश संपादन करता आले असून, या उल्लेखनीय निकालामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा अधिक दृढ झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माथणी शाळेत शिक्षक सुनिल अडसूळ यांनी राबविला निरंतर वाचन उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माथणी या शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ यांनी निरंतर वाचन उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे. आठवड्यातून एकदा वर्गात विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविले. त्यांना वाचण्यासाठी त्यांच्या आवडीची विविध पुस्तके उपलब्ध करून दिली.

या पुस्तकांमध्ये विविध प्रकारच्या लहान लहान गोष्टीची पुस्तके, चित्रमय पुस्तके , बोधकथेची पुस्तके, विज्ञानावरील पुस्तके, विविध राष्ट्रीय नेत्यांच्या जीवन कार्याची पुस्तके , आरोग्याच्या चांगल्या सवयींची पुस्तके , किशोर मासिके ,विविध सण समारंभ बाबत पुस्तके अशा अनेक पुस्तकांचा



समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी आनंदाने ही पुस्तके वाचन केली .पुस्तकांचे हे प्रदर्शन संपल्यानंतर त्यांना घरी वाचण्यासाठी पुस्तके देण्यात आली . विद्यार्थ्यांनी या पुस्तकांचे आनंदाने वाचन केले. विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकांची नावे व लेखकांची नावे सांगतात.वाचलेल्या पुस्तकांचा सारांश सांगतात.वाचलेल्या पुस्तकांचा सारांश लेखन करतात.यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाचा लळा लागला. त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. विद्यार्थी पुस्तक वाचून झाल्यावर दुसऱ्या पुस्तकांची आतुरतेने वाट पाहू लागले .दर आठवड्याला प्रत्येक विद्यार्थ्याने एका पुस्तकाचे आनंदाने वाचन केले .त्यामुळे त्यांची शब्दसंपत्ती वाढली. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागला .वाचनाने त्यांच्यावर चांगले संस्कार झाले .वाचनाने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजली. समाजहिताची व देशहिताची विविध मूल्य या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रुजण्यास मदत झाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास फार मोठे मदत झाली आहे.

या उपक्रमाचे महत्त्व पालकांना समजल्यामुळे त्यांनी लोकसहभागातून विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके भेट म्हणून दिली.

# लोकशाही सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराची नोंदणी आवश्यक – रूपाली दातरंगे

## प्रभाग क्र. ९ मध्ये मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण नोंदणी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण () अभियानांतर्गत प्रभाग क्र. ९ मधील दातरंगे मळा येथील पर्जन्येश्वर महादेव मंदिर परिसरात मतदार नोंदणी व कागदपत्र पडताळणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. या उपक्रमामुळे मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करण्यास मदत झाली.

यावेळी नगरसेविका सौ. रूपाली संदीप दातरंगे,, पै. शुभम दातरंगे, सनी आगरकर, संदीप दातरंगे, आनंद दातरंगे, प्रभागातील बीएलओ श्रीकांत शेलार, सुशीलकुमार आंधळे, अजयकुमार कोळगे, अंगणवाडी सेविका उंडे , डहाळे , गाजुल तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेविका सौ. रूपाली दातरंगे म्हणाल्या, ''मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा सर्वात मोठा लोकशाही हक्क आहे. त्या हक्काचा उपयोग करण्यासाठी मतदार यादीत नाव असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःची तसेच आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत की नाहीत, याची खात्री करून आवश्यक असल्यास तात्काळ नोंदणी करून घ्यावी. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग महत्त्वाचा आहे.''

त्या पुढे म्हणाल्या की, ''मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण अभियानात नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे. आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यास भविष्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी अशा प्रकारची शिबिरे सातत्याने आयोजित करण्यात येतील.''

प्रास्ताविक करताना संदीप दातरंगे यांनी मतदार नोंदणीचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, ''मतदार यादी ही लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही केवळ जबाबदारी नसून लोकशाहीप्रती असलेले कर्तव्य आहे. शासनाने दिलेल्या या संधीचा प्रत्येक नागरिकाने लाभ घेत आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. प्रभागातील एकही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.''

# वारकऱ्यांच्या भक्तिभावात पांडुरंगाचे दर्शन होते - प्रसाद गांधी

## मर्चंटस बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने वारकऱ्यांची सेवा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंढरीचा आषाढी वारी पायी दिंडी सोहळा हे महाराष्ट्राचे आध्यात्मिक व सांस्कृतिक वैभव आहे. आषाढी एकादशी निमित्त अहिल्यानगर शहरामधून पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीमधील वारकरी बंधू-भगिनींची सेवा करण्याची संधी मिळते ही अतिशय आनंदाची बाब आहे. वारकऱ्यांमध्ये पांडुरंगास पाहिले जाते. मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या प्रेरणेतून दरवर्षी वारकऱ्यांची सेवा करण्याचा आनंद मिळतो. वारकऱ्यांच्या भक्तिभावात पांडुरंगाचे दर्शन होते, अशा भावना अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेचे कर्मचारी प्रतिनिधी संचालक प्रसाद गांधी यांनी केले.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा नगर शहरातील मार्केट यार्ड येथे हनुमान मंदीराच्या प्रांगणात मुक्कामी होता. मर्चन्टस् बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील सर्व वारकरी बंधू-भगिनींना राजगिरा लाडू, चिवडा भेट देण्यात आला. यावेळी गांधी बोलत होते. सहमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी यांच्या हस्ते वारकऱ्यांना ही भेट देण्यांत आली. यावेळी कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, सीमा भंडारी, किशोर चोपडा, महेंद्र फिरोदिया, संतोष कटारिया, रामप्रसाद सारडा, योगेश गुगळे, अमित सोनग्रा, निलेश चंगेडिया, धीरज फिरोदिया, चेतन लोढा व सर्व कर्मचारी होते.

जॉइंट सीईओ नितीन भंडारी म्हणाले की, आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक पंढरपुरला पायी मार्गक्रमण करीत असतात. ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता केवळ विठुरायाच्या दर्शनाची ओढ असते. अशा वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य मर्चंटस बँकेच्या कर्मचाऱ्यांना लाभते. बँकेत कर्तव्य बजावताना जो सेवाभाव असतो तोच सेवाभाव कर्मचारी वारकरी सेवेत दर्शवतात. त्यामुळे प्रत्येकाला आध्यात्मिक ऊर्जा प्राप्त होते. बँकेच्या नगरमधील सर्व शाखांचे कर्मचारी वृंदांनी एकत्रित येऊन वारकरी बंधू-भगिनींना उपयुक्त भेट देण्याचे नियोजन केले. पांडुरंगानेच त्यांच्याकडून ही सेवा करवून घेतली. याकरिता बँकेचे चेअरमन संजय चोपडा, व्हाईस चेअरमन अमित मुथा यांच्यासह सर्व संचालक मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# खरवंडी कासार येथे वॉर्ड क्र. ३ मध्ये तीव्र पाणीटंचाई, ग्रामस्थांवर पाणी विकत घेण्याची वेळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथील वॉर्ड क्र. ३ मधील संत सेना महाराज मंदिर परिसर जगताप गल्ली, शनिगल्ली आणि महादेव मंदिर परिसर तसेच प्राथमिक शाळा परिसरात सध्या पाण्याचे तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. भीषण पाणीटंचाईमुळे येथील स्थानिक नागरिकांचे हाल होत असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ग्रामस्थांवर चक्क पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.टँकर सुरू, पण वॉर्ड क्र. ३ मध्ये टँकरच दाखल नाही खरवंडी कासार गावासाठी पाणी टँकर सुरू करण्यात आले आहेत. मात्र, टँकर सुरू झाल्यापासून वॉर्ड क्र. ३ मध्ये एकही खेप फिरकलेली नाही. या गंभीर समस्येबाबत नागरिकांनी सरपंच प्रदिप पाटील यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधला. मात्र, ''टँकर ड्रायव्हर ऐकत नाही'' असे उत्तर त्यांच्याकडून मिळाले. जेव्हा टँकर ड्रायव्हरला विचारणा करण्यात आली, तेव्हा ''ग्रामपंचायत कार्यालयासमोरून वाहन पुढे बसत (येत) नाही'' अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. लोकप्रतिनिधी आणि टँकर चालकांच्या या बेजबाबदार भूमिकेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.विहिरी आणि बोअरवेल कोरडे पडले आहेत पाण्याचा दुसरा कोणताही स्त्रोत उपलब्ध नसल्याने महिलांची पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती सुरू आहे. घरात पिण्यासाठी आणि इतर वापरासाठी पाणी नसल्याने, सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. प्रत्येक कुटुंबाची परिस्थिती पाणी विकत घेण्यासारखी सधन नसल्याने गरिबांचे अतोनात हाल होत आहेत रस्त्यावरील अडथळे आणि अडचणी दूर करून वॉर्ड क्र. ३ मध्ये तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पाथर्डी पंचायत समितीचे पाणीपुरवठा विभाग अधिकारी संदिप कासार साहेब यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दाद मागितली आहे.''वॉर्ड क्र. ३ मधील जनतेला तातडीने पाणी मिळाले नाही, तर ग्रामपंचायत कार्यालयावर तीव्र हंडा मोर्चा काढण्यात येईल,'' असा इशारा प्रशासनाला ग्रामस्थांनी दिला आहे. आता यावर पाणीपुरवठा विभाग आणि स्थानिक प्रशासन काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

(पान १ वरून)

## तोफखाना हद्दीतील सराईत चेनस्नॅचर एलसीबीच्या ताब्यात

नागपुरे हा कोथरुड (पुणे) येथे असल्याची माहिती मिळवली. पथकाने तात्काळ पुण्यात जाऊन संशयीतरित्या फिरणाऱ्या सागरला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने या गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ६२,१९० रुपये रोख आणि ७०,००० रुपये किमतीची बजाज मोटारसायकल जप्त करण्यात आली.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, सुनील पवार, शाहिद शेख, विष्णू भागवत, फुरकान शेख व पथकाने केली. आरोपीला पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करा

करण्यात आल्याचा तसेच सरकारी नझूल जमिनीच्या खरेदी व्यवहारातही मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.तसेच, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रोख रकमेतील तफावत लक्षात आणून देत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्या जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रोख मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आवश्यक पार्श्वभूमी तपासणी न करता नियुक्ती करण्यात आली, सुरक्षा नियम शिथिल करण्यात आले आणि कर्मचाऱ्यांची तपासणीही टाळण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

निवेदनानुसार, काही कर्मचाऱ्यांना यापूर्वीही चोरी करताना पकडण्यात आले होते. तरीदेखील त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई करण्यात आली नाही. उलट, त्यांना संरक्षण दिल्यामुळे अवघ्या चाळीस दिवसांत सुमारे ७० चोरीच्या घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, रोख रक्कम लपविणे आणि कॅमेरे झाकण्याचे प्रकार गुप्त कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्यानंतरही पोलिसांना तत्काळ माहिती न देता अंतर्गत चौकशी करण्यात आली. या काळात काही डिजिटल पुरावे नष्ट करण्यात आल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, जून २०२६ मध्ये अंतर्गत कारवाईदरम्यान एका कर्मचाऱ्याकडून सुमारे □५८ लाखांची रोख रक्कम जप्त करण्यात आली होती. मात्र, एवढी मोठी रक्कम हस्तगत होऊनही संबंधितांविरुद्ध तात्काळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यानंतर काही व्हिसलब्लोअर्स आणि सार्वजनिक प्रतिनिधींनी हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर उशिराने दाखल करण्यात आला. मात्र त्यामध्ये केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांनाच आरोपी करण्यात आले असून वरिष्ठ व्यवस्थापनाला वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतल्यानंतर ट्रस्टच्या दैनंदिन बँक ठेवींमध्ये मोठी वाढ झाल्याचा उल्लेख करून, यापूर्वी दररोज लाखो रुपयांचा अपहार होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व आर्थिक व्यवहारांची अंमलबजावणी संचालनालय () मार्फतही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी बोलताना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष दीप चव्हाण म्हणाले, ''श्रीराम हे देशातील कोट्यवधी नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहेत. रामभक्तांनी विश्वासाने दिलेल्या देणग्यांचा अपहार झाला असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. आमचे आंदोलन कोणत्याही धर्माविरोधात नसून भ्रष्टाचाराविरोधात आहे. श्रीराम मंदिराची पवित्रता, रामभक्तांचा विश्वास आणि सार्वजनिक निधीचे संरक्षण करण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करावेत आणि आवश्यक असल्यास मार्फतही तपास करण्यात यावा.''

आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या प्रकरणात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता () कलम १७३(१) अंतर्गत प्रथम माहिती अहवाल () नोंदवून सर्व संबंधितांविरुद्ध निष्पक्ष, सखोल आणि वेळेत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.